Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary.stateboard@gmail.com
Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 | Secretary(P) : 25651750

जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/२५०४
दिनांक-३०/०४/२०२०.

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषय** – माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस सन २०१९-२० मध्ये प्रविष्ठ होणा-या विदयार्थ्यांना सवलतीच्या वाढीव गुणासाठीचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

**संदर्भ** :-
१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.उमाशि-२०१५/ प्र.क्र.२६२/ एस.डी.२ दि.२०/१२/२०१८
२. शासन शुध्दीपत्रक क्र. उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२ दि.२५/०१/२०१९
३. शासन पत्र क्र.मंडळ-२०१६/प्र.क्र.२२०/एस.डी.-२ दि.१६ जानेवारी २०२०.
४. क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे क्र.क्रीयुस/मार्गदर्शन/ १९- २०/का-४ दि.१५/०४/२०२० चे पत्र.
५. क्र.रा.मं./परीक्षा-७/२४७३, दिनांक २३/०४/२०२०रोजीचे पत्र
६. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक -उमाशी-२०२०/प्र.क्र.६२/एसडी-२, दिनांक २९/०४/२०२० रोजीचे पत्र

उपरोक्त विषयी संदर्भिय क्र. १ चा शासन निर्णय व संदर्भिय क्र. २ या कार्यालयाचे पत्र पहावे. या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत शासनाने संदर्भिय क्र. १, दिनांक २०/१२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित नियमावली प्रसिध्द केलेली आहे. सदर नियमावली मधील अनुक्रमांक ९ अन्वये संबंधीत खेळाडू विदयार्थ्यांचे क्रीडा गुण सवलत मिळण्यासाठीचे प्रस्ताव दि.१ जानेवारी ते ५ एप्रिल पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सादर करण्याबाबतची तरतुद केलेली आहे.तसेच अनुक्रमांक ९ अन्वये संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करून पात्र प्रस्ताव शिफारशीसह विभागीय शिक्षण मंडळास दि.३० एप्रिल पर्यंत सादर करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

तथापि केंद्र व राज्य शासनद्वारा कोरोना विषाणू (कोविड-१९)या साथीच्या संसर्गजन्य आजारामुळे दि.२१ मार्च २०२० पासून राज्यात व देशभरात दिनांक ०३/०५/२०२० पर्यंत संचारबंदी जाहीर केली असल्याने, अनेक खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सादर करणे शक्य झालेले नाही. यामुळे अनेक पात्र खेळाडू क्रिडा गुण सवलतीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

त्यामुळे संबधित शाळा/कनिष्ठ महाविदयालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी खेळाडूंचे परिपूर्ण प्रस्ताव विहित नमुन्यात दि.१३ मे २०२० पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर करणे व संबधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्राप्त प्रस्तावांची छाननी करून दि.२० मे २०२० पर्यंत संबंधित विभागीय मंडळ कार्यालयास शिफारशीसह सादर करण्याबाबत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२/-

तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थी व शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागीय होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण मिळण्याकरिताचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी शाळांकडे दिनांक १३ मे २०२० व माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे दिनांक २० मे २०२० पर्यंत सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तरी उपरोक्त शासन पत्रानुसार सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी.सदर मुदतवाढ आपल्या कार्यक्षेतील सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरून सदरबाबत प्रसिध्दी देण्यात यावी. कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय केवळ सन २०१९-२० या एका शैक्षणिक वर्षाकरिता लागू राहिल.

सचिव
राज्यमंडळ, पुणे-४.

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
१. मा. श्री. संतोष गायकवाड,अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. मा.आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
३.मा.आयुक्त,क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१५.
प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी- व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/वाढीव गुण सवलत/३७२६
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक:-०४/०५/२०२०

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) सन २०१९-२०२० मध्ये प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे (खेळाडू, एन.सी.सी, स्काऊट गाईड व कला सवलतीचे ) वाढीव गुण देण्याबातचे प्रस्ताव सादर कराण्यास <u>२० मे २०२०</u> पर्यंत मुदतवाढ देण्याबाबतच्या राज्य मंडळाचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/२५०४ दि.३०/०४/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.